# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला प्रारंभ–सुमारे दीड कोटींहून अधिक भाविकांचं कुंभस्नान
- देशाचा प्रत्येक भाग–प्रत्येक कुटुंब प्रगतीपथावर वाटचाल करेल तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- मकरसंक्रातीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा फुलल्या–खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी

आणि

- नवी दिल्लीत आजपासून पहिल्या खो–खो विश्वचषक क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

****

महाकुंभमेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथं सुरुवात झाली. आज, पौष पौर्णिमेपासून सुरु झालेला कुंभमेळा पुढचे ४५ दिवस म्हणजे महाशिवरात्रीपर्यंत सुरु राहणार आहे. गंगा, यमुना आणि गुप्त सरस्वती या नद्यांच्या पवित्र संगमात आज पहिलं शाही स्नान झालं. आज सायंकाळपर्यंत सुमारे दीड कोटींहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

महाकुंभमेळ्याची सुरुवात झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय मूल्यं आणि संस्कृतीची जोपासना करणाऱ्या कोट्यवधी भारतीयांसाठी ही एक विशेष पर्वणी असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

महाकुंभ मेळ्यासाठी भारतीय रेल्वेनं पाच हजार कोटी रूपयांची गुंतवणूक केली आहे. यातून नवीन पायाभूत सुविधा आणि विद्यमान सुविधांचे अद्ययावतकरण करण्यात आलं असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. रेल्वेमार्ग दुप्पट करणं, नवीन फलांटाची उभारणी, गंगा नदीवर नवीन पुल उभारणी यासारख्या सुविधा यातून निर्माण करण्यात आल्या असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

देशाचा प्रत्येक भाग, प्रत्येक कुटुंब प्रगतीपथावर वाटचाल करेल तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. जम्मू काश्मीर मध्ये श्रीनगर– सोनमर्ग मार्गावरच्या बोगद्याचं आज पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. या बोगद्यामुळे श्रीनगर आणि सोनमर्गदरम्यान बारमाही संपर्क कायम राहून पर्यटनाबरोबरच रोजगार निर्मिती, आरोग्य सुविधा यानांही चालना मिळेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ जम्मू काश्मीरच्या नागरिकांना मिळत असल्याबद्दल मोदी यांनी समाधान व्यक्त केलं, ते म्हणाले –

> ***हमारा जम्मू कश्मीर अब टनेल का, उंचे उंचे पुलों का, रोप वे का हब बनता जा रहा है। दुनिया की सबसे उंची टनेल यहां बन रही है। दुनिया के सबसे उंचे रेड रोल ब्रीज, केबल ब्रीज यहां बन रहे है। दुनिया की सबसे उंची रेल लाईन्स यहां बन रही है। हमारे चिनाब ब्रीज की इंजिनिअरिंग देखकर पुरी दुनिया हैरत मे है।***

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. मुंबई इथं नौदलातील आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. नवी मुंबईतील खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या १९ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार १७ तारखेपर्यंत एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य शून्य या नि:शुल्क

क्रमांकावर, मायजीओव्ही ओपन फोरमवर किंवा नमो ॲप वर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी २६ तारखेला प्रजासत्ताक दिन असल्यामुळे हा कार्यक्रम १९ तारखेला होत आहे.

****

पणन विभागामार्फत सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्यात यावी अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विभागाकडून १०० दिवसात करण्यात येणाऱ्या कामाचा आढावा फडणवीस यांनी आज मुंबई इथं घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यासाठी आवश्यक यंत्रणा उभी करावी, राज्यात विविध ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या कृषी साठवणूक केंद्राचा प्रस्ताव सादर करावा, कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवावी अशा सूचनाही फडणवीस यांनी यावेळी दिल्या. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जाभूरगाव इथं कृषी केंद्राची उभारणी पूर्ण झाली असून येत्या ४५ दिवसात त्याचं लोकार्पण करण्यात येणार असल्याचं पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यातल्या शालेय शिक्षकांमधील गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन शिक्षणात चांगला बदल हाऊ शकतो यामुळे शालेय शिक्षणात राज्य पुन्हा एकदा आघाडीवर येईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आज शालेय शिक्षण विभागाच्या १०० दिवसांचा आराखड्याचा आढावा घेतल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. राज्य अभ्यासक्रम आराखड्याची पुढील वर्षापासून अंमलबजावणी, पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर प्रत्येक क्लस्टरमधून एका शाळेचा सीएम श्री शाळा म्हणून विकास करणं, शिक्षक भरती प्रक्रिया जलदगतीने राबवणं, यासारखे अनेक निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

पर्यटन विभागाचाही शंभर दिवसाच्या कामकाजाचाही मुख्यमंत्र्यांनी आज आढावा घेतला. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पर्यटन पोलीस नेमणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. अजिंठा वेरूळ पर्यटन विकास कामं सुरू करून त्याला गती देणं, राज्यात पाच ठिकाणी शिवसृष्टी थीम पार्क उभारणं तसंच शासकीय पर्यटन विकासीच कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना फडणवीस यांनी संबंधितांना केल्या.

****

सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण उद्या साजरा होत आहे. या दिवशी परस्परांना तीळगुळ वाटपाचा प्रघात आहे. महिलावर्गात सौभाग्यदानासह मातीच्या सुगड्यांमधून विविध वस्तूंचं वाण दिलं जातं. या पार्श्वभूमीवर बाजारपेठा विविध पूजा साहित्यासह ऊस, बोरं, हरभरा आणि इतर साहित्यानं फुलून गेल्या आहेत.

मकरसंक्रांतीला पतंग उडवण्याची परंपरा आहे, या निमित्तानं विविध प्रकारच्या पतंगांनी दुकानं सजली आहेत. पतंगाची खरेदीसाठी आबालवृद्धांचा उत्साह दिसून येत आहे. नायलॉनचा मांजा विक्री करणाऱ्यांवर पोलीस कडक कारवाई करत असून, असा मांजा वापरू नये या साठी शहरातील अनेक चौकात वाहतूक पोलीसांना कडून भोंग्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

**नायलॉन मांजा मुळे पक्षी, सामान्य जनता सर्वाधिक जखमी होतात म्हणून नायलॉन मांजाची खरेदी अथवा विक्री होत असतांना तसंच नायलॉन मांजाच्या सहाय्याने कुणी पतंग उडवत असल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

****

नवी दिल्लीत आजपासून पहिल्या खो-खो विश्वचषक क्रीडा स्पर्धा रंगणार आहेत. १९ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २३ देशांचे ३९ संघ सहभागी होत आहेत. भारताच्या पुरुष संघाचं नेतृत्व प्रतीक वायकरकडे असून महिला संघाचं नेतृत्व बीड जिल्ह्यातली प्रियंका इंगळे करत आहे. पुरुष संघाचा सलामीचा सामना आज नेपाळशी तर महिला संघाची सलामीची लढत उद्या कोरिया सोबत होणार आहे. डीडी स्पोर्टस वाहिनीवरुन रात्री साडे आठ वाजेपासून या सामन्याचं थेट प्रसारण पाहता येणार आहे.

****

अहिल्यानगर इथं २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेची तयारी सुरू झाली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते आज या स्पर्धा मैदानाचं मातीपूजन करण्यात आलं. कुस्तीला नवे वैभव मिळवून देण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करावेत, असं आवाहन मोहोळ यांनी केलं.

****

सोलापूरचं ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यात्रेतील अक्षता सोहळा आज दुपारी उत्साहात पार पडला. तत्पूर्वी सकाळी मानकरी हिरेहब्बुंच्या निवासस्थानापासून सातही नंदीध्वजांची विधिवत पूजा करुन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या यात्रेसाठी भाविक मोठ्या संख्येनं सोलापुरात दाखल झाले आहेत.

****

बीड जिल्ह्यातले मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटक झालेल्या वाल्मिक कराड विरोधात मकोका अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी आज मस्साजोग इथं पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. या आंदोलनात देशमुख यांच्या कुटुंबासह गावकरी सहभागी झाले होते. यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, तसंच मराठा आंदोलन कर्ते मनोज जरांगे पाटील यांनी याठिकाणी येऊन देशमुख यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात गेल्या दोन दिवसात विविध ठिकाणचा वाळूचा अवैध साठा महसूल विभागानं जप्त केला आहे. अप्पर तहसीलदार नितीन गर्जे यांच्या पथकानं ही कारवाई केली. अवैध वाळू वाहतूक आणि साठ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. महसूल पथकानं जप्त केलेला वाळू साठा अप्पर तहसील कार्यालय परिसरात संकलित करण्यात आला आहे.

****